पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

परीक्षा व मूल्यमापन मंडळ Board of Examinations and Evaluation

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 1935
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक : 23 SEP 2024
Date :

## परिपत्रक क्रमांक- ४९

पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेश पुर्व परीक्षा (PET-९) चे आयोजन दिनांक ३०/०७/२०२४ रोजी ऑनलाईन वेब बेस्ड पध्दतीने ओयोजित करण्यात आले होते. त्यानुसार सदरची परीक्षा सुरळीत संपन्न झाली आहे. सदर परीक्षेच्या दिवशी व तद्नंतर काही विद्यार्थ्यांनी ईमेल द्वारे / पत्राद्वारे खालील प्रमाणे मागणी केली आहे.

१. जे विद्यार्थी तांत्रिक कारणामुळे सदरची परीक्षा देवू शकले नाही, तसेच ज्या विद्यार्थ्यांना सदरच्या परीक्षेसाठी विहित कालावधी मिळालेला नाही अशा विद्यार्थ्यांनी फेर परीक्षा घेण्याची विनंती ईमेल/पत्राद्वारे केली आहे.

२. काही परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी ईमेल/पत्राद्वारे परीक्षेच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रती (Photo Copy) आणि पुनर्मूल्यांकन (Revaluation) या सुविधेची मागणी केली आहे.

उपरोक्त प्रमाणे ईमेल / पत्राद्वारे विद्यार्थ्यांनी पेट-९ परीक्षेसंदर्भात मागणी केलेल्या सर्व मुद्याबाबत तक्रारदार विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, दि.३०/०७/२०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन वेब बेस्ड पेट परीक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व तांत्रिक बाबींच्या सुविधेबाबत सर्व विद्यार्थ्यांना अवगत करण्यात आले होते, तसेच या सर्व तांत्रिक बाबींची विद्यार्थ्यांना आयत्यावेळी अडचण निर्माण होवू नये याकरिता दि.२५/०७/२०२४ व दि.२६/०७/२०२४ या दिवशी ऑनलाईन सराव परीक्षा (Mock Test) आयोजित करण्यात आली होती. जेणे करुन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षे दिवशी कोणतीही तांत्रिक अडचण येवू नये व विद्यार्थ्यांना सुरळीतपणे परीक्षा पार पाडता येईल. तसेच सदर सराव परीक्षेची (Mock Test) व प्रत्यक्ष परीक्षेची लिंक सर्व विद्यार्थ्यांना विहित मुदतीत व विहित वेळेत उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता मुद्दा क्रमांक १ नुसार फेर परीक्षा घेण्याबद्दलची केलेली विनंती अमान्य केलेली आहे.

तसेच मुद्दा क्रं.२ बाबत विद्यार्थ्यांना Rules for Ph.D Program २०२३-२४ मधील R. Ph.D. ५.३ नुसार सदर परीक्षेच्या उत्तरपत्रिकेची छायाकिंत प्रती (Photo Copy) आणि पुनर्मूल्यांकन (Revaluation) ही सुविधा उपलब्ध करुन देता येणार नाही. तसेच तक्रारी बाबत वैयक्तिकरित्या पत्र व्यवहाराद्वारे किंवा ईमेलद्वारे कळविण्यात येणार नाही. याची सर्व परीक्षार्थींनी नोंद घ्यावी.

(डॉ. श्रीकांत ग. अंधारे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ